# नवरात्र म्हणजे शक्ती उपासना

नवरात्राचे दिवस म्हणजे शक्तीची उपासना करण्याचे दिवस. जगामध्ये कोणतीही नैतिक मूल्ये केवळ चांगली आहेत म्हणून टिकत नाहीत; तर त्यांचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी त्यांच्या पाठीमागे सामर्थ्याचे पाठबळ असणे आवश्यक असते. या संदर्भात आश्विन महिन्यात येणाऱ्या ह्या नवरात्र उत्सवाबाबत एक पौराणिक कथा प्रसिध्द आहे. महिषासुर नावाचा एक राक्षस अतिशय प्रभावी बनला होता. त्याने स्वत:च्या सामर्थ्याच्या बळावर अनेक देवांना व मनुष्यांना त्राहि त्राहि करुन सोडले होते. दैवी विचारांची प्रभा अस्पष्ट बनली होती व लोक भयग्रस्त झाले होते. धैर्य घालवून बसलेल्या देवांनी ब्रह्मा, विष्णू व महेश ह्यांची आराधना केली. देवांच्या प्रार्थनेने प्रसन्न झालेल्या आद्य देवांना महिषासुराचा राग आला. त्यांच्या पुण्यप्रकोपातून एक दैवी शक्ति निर्माण झाली. सर्व देवांनी जयजयकार करुन, तिचे पूजन केले. तिला स्वत:च्या दिव्य आयुधांनी मंडित केले. ह्या दिव्यशक्तीने नऊ दिवस अविरत युध्द करुन महिषासुराला मारले. आसुरी वृत्तीला संपवून, दैवी शक्तीची पुन्हा स्थापना करुन देवांना अभय दिले. ही शक्ती देवता म्हणजेच आपली जगदंबा. ह्या दिवसात आई जवळ शक्ती मागावची व आसुरी वृत्तीवर विजय मिळवायचा. आजही महिषासुर जवळ जवळ प्रत्येकाच्या अंत:करणात आहे आणि हृदयात असलेल्या दैवी वृत्तींना त्यांने गुदमरवून सोडले आहे. ह्या महिषासुराच्या मायेला ओळखले पाहिजे. तिच्या आसुरी जुलमापासून मुक्त होण्यासाठी आवश्यकता आहे, दैवी शक्तीच्या आराधनेची ! नऊच्या नऊ दिवस अखंड दीप तेवत ठेवून आई जगदंबेची पूजा करुन तिच्या पासून शक्ती प्राप्त करुन घेण्याचे दिवस म्हणजे नवरात्राचे दिवस!

असूर म्हणजे मोठया दातांचे, मोठया नखांचे, लांब केस, मोठे डोळे असलेले कोणी महाभयंकर राक्षस ! अशी आपली भ्रांत समजूत आहे. खरे पाहता असूर म्हणजे असुषु रमन्ते इति असुर: प्राणातच रममाण होणारे, भोगातच रमणारे. तसेच महिष म्हणजे रेडा. त्या दृष्टीने पाहता रेडयाची वृत्ती बाळगणारा तो महिषासूर. रेडा नेहमी स्वत:चेच सुख पाहतो. समाजात ही रेडयाची वृत्ती पसरत चालली आहे. परिणामत: संपूर्ण समाज स्वार्थी, प्रेम विरहित व भावशून्य बनला आहे. समाजात आज व्यक्तिवाद व स्वार्थीवृत्ति अमर्याद बनून महिषासुर रुपात नाचत आहे. ह्या महिषासुराच्या नाकात वेसण घालण्यासाठी आईजवळ सामर्थ्य मागण्याचे दिवस म्हणजे नवरात्राचे दिवस !

आपल्या वेदांनी देखील शक्तीच्या उपासनेला महत्व दिलेले आहे. तसेच महाभारताचे पान अन् पान बलोपासना व शौर्यपूजा ह्यांनी भरलेले आहे. व्यास, भीष्म व कृष्ण ह्यांची सर्वच भाषणे तेज, ओज, शौर्य, पौरुष व पराक्रम ह्यांनी भरलेली आहेत. महर्षी व्यासांनी पांडवाना शक्ती उपासनेचे महत्व समजावले आहे. त्यांनी पांडवाना उपदेश केला आहे की, तुम्हाला जर धर्माची मूल्ये टिकवायची असतील तर हात जोडून बसून राहून चालणार नाही. शक्तीची उपासना करावी लागेल. अर्जुनाला दिव्य अस्त्र प्राप्त करण्यासाठी व्यासानींच स्वर्गात जाण्याची सूचना केली होती.

अनादि कालापासून आसूरी वृत्ती सत् विचारांशी विरोध करीत आलेली आहे आणि दैवी विचार अडचणीत येताच देवांनी भगवंताजवळ शक्ती मागितली आहे, सामर्थ्य मागितले आहे आणि आसूरी वृत्तीचा पराभव केला आहे. केवळ सत् विचार तेवढे पुरत नाहीत. त्यांचे रक्षण होणे देखील आवश्यक आहे आणि त्यासाठी शक्तीची उपासना आवश्यक आहे. आपणही आळस झटकून क्षणिक प्रमादांना दूर सारुन पुन्हा शक्तीची उपासना सुरु केली पाहिजे. संघेशक्ति: कलौ युगे ही गोष्ट ध्यानात ठेवून नवरात्राच्या दिवसात दैवी विचारांच्या लोकांची संघटना करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

देवीची प्रार्थना करताना, माते! तू आम्हाला सदबुध्दी दे, आम्हाला संघबळ दे. आमच्या संघबळाच्या आड आमचा अहंकार येतो, आमची महिषी वृत्ती जागृत होते. आमचे व्देष उफाळून येतात त्यांना तू नष्ट कर !

आई जगदंबेची आपली ही उपासना नवरात्रात सुरु होते. पण ती केवळ नऊ दिवासांपुरती सीमित राहू नये. हे ध्यानात ठेवण्याची गरज आहे. क्षणाक्षणाची शक्ती उपासना आपल्याला जडवादी जगात उभे रहायला शक्ती प्रदान करील.

नवरात्राचे दिवस म्हणजे शक्तीच्या उपासनेचे दिवस. आईच्या पूजेचे दिवस. खा, प्या व मजा करा, अशा आसुरी विचार सरणीवर विजय मिळविण्याचे दिवस. संघशक्तीचे महत्त्व व भक्तीची महत्ता समजाविण्याचे दिवस तसेच तपश्चर्येचा महिमा व एकता ह्यांचे महत्त्व समजाविणारे दिवस म्हणजेच नवरात्राचे दिवस.

नऊ दिवस युद्ध केल्यानंतर महिषासुराचा वध करून विजय मिळविला तो विजयादशमीचा दिवस सर्वत्र मोठ्या उत्साहाने - आनंदाने साजरा केला जातो.

नवरात्र / घटस्थापना करण्याविषयी:-

देवघरात आंब्याच्या पानाचे तोरण लावून, रांगोळी इ. ने देवघर सुशोभित करावे. स्त्रीयांनी डोक्यावरुन स्नान करावे. कर्त्याने धूतवस्त्र किंवा रेशमी वस्त्र नेसून देवासमोर बसून आचमन करावे. देशकाल कथन करुन देवतेच्या नावाचा उच्चार करुन संकल्प करुन उदक सोडावे. यामध्ये घटस्थापना, मालाबंधन, अखंड नंदादीप, सप्तशती पाठ, कुमारीका पूजन यापैकी जे जे करणार आहोत त्यांचा उल्लेख संकल्पात यावा. त्यानंतर महागणपति, कलश, शंख, घंटा यांचे पूजन करावे. देवीची पूजा करताना श्री सूक्ताने अभिषेक करावा. घटावर किंवा देवींवर रोज एक फुलांची किंवा कापसाची माळ बांधावी, त्याच ठिकाणी अंखड नंदादीप लावावा. रोज नैवेद्य दाखवावा.

**नवरात्रामध्ये अखंड नंदादीप लावला जातो काही वेळेस वाऱ्याने किंवा काजळी काढताना तो विझतो. अशा वेळेस काही अशुभ नसते, तो नंदादीप पुनः लावता येतो.**

नवरात्रातील ललित पंचमी :- आश्विन शु. पंचमीस ललिता पंचमीचे व्रत करतात. या व्रताची पूजा करंडकाचे स्वरूपात असलेल्या ललिता देवीची करावयाची असते. 48 दूर्वांची 1 जूडी याप्रमाणे 48 जुड्या वहावयाच्या असतात ललिता त्रिशती नामावली वाचावी. तसेच नवरात्रामध्ये सरस्वतीचे पूजन करण्यास सांगितले आहे. नवरात्रामधील आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे महाष्टमी (महालक्ष्मी) पूजन. या दिवशी घागरी फुंकण्याचा कार्यक्रम असतो. अशा प्रकारे नवरात्रामध्ये देवीच्या तीनही रुपांची म्हणजे 1) महाकाली 2) महासरस्वती 3) महालक्ष्मीची पूजा करण्याने शक्ति, विद्या व धन सामर्थ्य प्राप्त होते.

नवरात्रीच्या उपवास व कुलधर्मा विषयी:-

नवरात्र म्हणजे आश्विन शु. प्रतिपदा ते नवमी या कालावधीत देवीची उपासना करताना केले जाणारे विधि, कुलधर्म, उपवास, पूजाअर्चा होय.

काही वेळेस सोयर-सुतक यामुळे प्रतिपदेच्या दिवशी नवरात्रारंभ करता येत नाही. अशा वेळेस 7 दिवसापासून 1 दिवसापर्यंतचे सुद्धा नवरात्र करता येते. वय, व्याधी इ. मुळे 9 दिवस उपवास करणे शक्य नसते अशा वेळेस पहिल्या व शेवटच्या दिवशी किंवा फक्त अष्टमीचा उपवास करावा.

देवीचे नवरात्र बसविल्यावर त्या देवीवर किंवा घटावर फुलाने पाणी शिंपडून अभिषेक व पूजेचे उपचार करावेत. मात्र पूजेतील इतर देवदेवतांना नेहमीप्रमाणे ताम्हनात ठेवून अभिषेक व नंतर पूजा करावी.

याप्रमाणे यावर्षी 16 ऑक्टोबर रोजी, मंगळवारी घटस्थापना नवरात्रारंभ करावा, घटस्थापना सकाळी सूर्योदयानंतर मध्याह्नकालापर्यंत करता येईल. 19 ऑक्टोबरला ललिता पंचमीचे पूजन करावे. 21 ऑक्टोबर रोजी महालक्ष्मी पूजन (घागरी फुंकणे) व सरस्वती पूजन करावे आणि 24 ऑक्टोबरचे दिवशी विजयादशमी (दसरा) उत्सव साजरा करावा.

पंचांगकर्ते

श्री. मोहन दाते.